# १२. * ग्रामविकास व जलसंधारण विभागाला नेमून दिलेले विषय

*दिनांक ११ ऑगस्ट १९९२ या शासकीय अधिसूचनेद्वारे मूळ शीर्षकाऐवजी दाखल करण्यात आले.

**एक. ग्रामविकास विभाग**

१. ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य म्हणजेच जिल्हा परिषद, पंचायत समित्या व ग्रापंचायती यांची रचना, अधिकार कामे व सेवा.

२. दिनांक ९ नोव्हेंबर १९९५ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे वगळण्यात आले.

३. दिनांक ५ जून १९९२ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे वगळण्यात आले.

४. दिनांक ५ जून १९९२ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे वगळण्यात आले.

५. ग्रामीण भागातील कत्तलखान्यांचे बांधकाम, परिरक्षण व नियंत्रण, (तसेच कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाखालील *नोंद क्रमांक ४१ नगरविकास विभागाखालील **नोंद क्रमांक २० बी व ग्रामविकास व जलसंधारण विभागाखालील नोंद क्रमांक १६-अ पहा).

*दिनांक २७ फेब्रुवारी १९७९ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे समाविष्ट करण्यात आले.

**दिनांक २० ऑगस्ट १९८२ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे बदल करण्यात आला.

६. सामूहिक विकास कार्यक्रम.

७. स्थानिक विकास.

८. बहुउद्देशीय प्रकल्प व आदिवासी विकास गट.

९. राज्य परविहन मार्ग विकास निधी (तसेच गृह विभागाखालील नोंद क्रमांक २७, ३८ आणि ३० पहा).

१०. वृत्तपत्रांतील प्रसिद्ध केलेल्या जाहिराती व त्यांच्यावर ग्रामीण भागात जेवढा कर आकारलेला असेल त्याखेरीज जाहिरातीवर आधारित वृत्तपत्र वगळता मालाच्या खरेदी व विक्रीवरील कर, पशू व बोटीवरील कर, आजीविका व सेवायोजन, व्यापार, व्यवसाय कर, प्रतिव्यक्त कर वसूल करणे (तसेच महसूल व वन विभागाखालील नोंद क्रमांक १८ व नगरविकास विभागाखालील नोंद क्रमांक ६ पहा).

११. ग्रामीण स्थानिक क्षेत्रात वापर, विनिमय किंवा विक्रीसाठी बाहेरून आलेल्या मालावरील उपकर (तसेच नगरविकास विभागाखालील नोंद क्रमांक ७ पहा).

१२. जमिनी व इमारती यावरील कर (त्यांच्यावर ग्रामीण भागातील स्वयंशासित समित्यांद्वारे जेवढा कर आकारण्यात येत असेल तेवढा). (तसेच महसूल व वन विभागाखालील नोंद क्रमांक ७ आणि ८ व नगरविकास विभागाखालील नोंद क्रमांक १६ पहा).

१३. रेल्वे, समुद्र किंवा हवाई वाहतुकीद्वारे वाहून आणलेल्या मालावरील किवा प्रवाशांवरील सीमाकर, रेल्वे प्रवासभाडे व वाहतूक यांवरील कर. (स्थानिक नागरी समित्यांशी संबंधित असेल तितपत). (तसेच नगरविकास विभागाखालील नोंद क्रमांक १७ पहा).

१४. दिनांक २४ जून १९९३ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे वगळण्यात आले.

१५. ग्रामविकास.

१५-अ. *ग्रामीण भागातील बेघर व भूमिहीन मजूर यांच्यासाठी घराकरिता जागेची आणि झोपड्यांच्या बांधकामाची तरतूद करण्याच्या योजना.

*दिनांक ११ ऑगस्ट १९९३ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे समाविष्ट करण्यात आले.

१५-ब. *कोणत्याही ग्रामपंचायतीच्या स्थानिक मर्यादेत यात्रा स्थळासाठी विशेष विकास कार्यक्रम.

*दिनांक २२ जून १९९३ ची शासकीय अधिसूचना व दिनांक १९ ऑगस्ट १९९३ चे शासकीय शुद्धिपत्र यांद्वारे समाविष्ट करण्यात आले.

१६. ग्रामीण भागातील दफन व दफनभूमी आणि दहन व दहनभूमी (तसेच सामान्य प्रशासन विभागाखालील नोंद क्रमांक १३ पहा व नगरविकास विभागाखालील नोंद क्रमांक ३ पहा).

१६-अ *महानगरपालिका व नगरपालिका यांच्या अधिकारितेखाली असलेल्या भागांतील कोंडवाड्यांखेरीज गुरांचे इतर ठिकाणांचे कोंडवाडे यांसह गुरांच्या अपप्रवेशावर बंदी घालणे व त्यांना कोंडवाड्यात डांबणे (तसेच गृह विभागाखालील नोंद क्रमांक २२ अ व ** नगरविकास विभागाखालील नोंद क्रमांक ** २० पहा).

*दिनांक ५ डिसेंबर १९७९ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे समाविष्ट करण्यात आले.

**दिनांक १२ जानेवारी १९८१ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे दाखल करण्यात आले.

१६-ब ग्रामीण भागातील जैव-वायु संयंत्र योजनेचे प्रशासन (नगरविकास विभागाखालील नोंद क्रमांक २०-अ पहा).

*दिनांक २४ मार्च १९८३ च्या शासकीय १९८२ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे समाविष्ट करण्यात आले.

१६-क एकात्मिकृत ग्रामीण विकास कार्यक्रम यांसारख्या अभिकरणांनी चालवलेली जिल्हा ग्रामीण विकास अभिकरणे व योजना.

**(जवाहर रोजगार योजना वगळून) आणि राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम.

*दिनांक २४ मार्च १९८२ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे समाविष्ट करण्यात आले.

**दिनांक ५ जून १९९२ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे समाविष्ट करण्यात आले.

**एक-ए. *जलसंधारण**

(ड) दिनांक ९ नोव्हेंबर १९९५ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे वगळण्यात आले.

(ई) २५० हेक्टरपर्यंतची लहान पाटबंधाऱ्यांची बांधकामे.

(फ) मृदसंधारण.

(ग) वन महोत्सवासह सामाजिक वनीकरण.

(ह) जवाहर रोजगार योजना.

(य) प्रवर्षणग्रस्त भागातील कार्यक्रम.

(ज) श्रमशक्तिद्वारा ग्रामविकास.

*दिनांक ११ ऑगस्ट १९९२च्या शासकीय अधिसूचनेद्वारे समाविष्ट करण्यात आले.

**दोन. सर्वसाधारण**

१७. ग्रामविकास व जलसंधारण विभागाला नेमून दिलेल्या कोणत्याही विषयासंबंधातील हुकूमनाम्याची देय असलेली रक्कम निर्लेखित करणे.

१८. या सूचीमधील कोणत्याही बाबीच्या प्रयोजनासाठी चौकशी व आकडेवारी.

१९. या सूचीतील कोणत्याही बाबीच्या संबंधातील परंतु कोणत्याही न्यायालयात स्वीकारण्यात न आलेली फी.

२०. राज्याच्या प्रयोजनासाठी शासनाकडे निहित केलेली किंवा शासनाच्या ताब्यात असलेली आणि ग्रामविकास व जलसंधारण विभागाला नेमून दिलेली बांधकामे, जमिनी व इमारती.